
ज्ञान प्रबोधिनी प्रशाला ५१

# 51@51

आम्ही ५१!



## गोष्ट क्र. ५१

हेमंत जोगळेकर

(इ. ११वी १९७२)

दि. १६ जानेवारी २०२२

प्रशालेच्या पहिल्या दहा तुकड्यांमधील व्यक्तींचा प्रवास शब्दबद्ध करण्याचा हा उपक्रम मला चांगला वाटतो. सर्वच्या सर्व ५० गोष्टी मी वाचू शकलेलो नाही पण प्रत्येकाच्या वाटचालीतून काही ना काही महत्त्वाची शिकवण घेण्यासारखी असणारच. प्रत्येकानेच येणाऱ्या परिस्थितीला सामोरे जात मार्गक्रमणा केली आहे. आपण प्रबोधिनीत व्यक्तीविकास व कार्यविकास असे म्हणतो. एक्सलन्स आणि कमिटमेंट–आयडियालॉजी असे दोनही आदर्श आपण मानतो. व्यक्तींच्या वाटचालीतून त्यांचे–त्यांचे आयुष्य व कर्तृत्व तर नक्कीच फुलले, बहरले पण या प्रवासाचा समष्टीला काय उपयोग झाला यावरही भाष्य होणे, विचार करणे उपयुक्त आहे असे मला वाटते. आपल्याकडे 'ततः किम्' हे पद्य आहे. प्रबोधिनीत शिकलेली व मिळवलेली मूळ शिदोरी पुढच्या प्रवासात आपण कशी उपयोजित करतो आहोत याचे प्रत्येकच प्रबोधकाने चिंतन करीत राहिले पाहिजे. ५१@५१ या मालिकेच्या निमित्ताने मला हेच मनापासून वाटते. देशप्रेम, नैतिकता, प्रेरणासंपन्नता ही बीजे घेऊन प्रबोधिनी प्रशालेतून आपण सर्वजण व्यावहारिक जगात उतरतो. या बीजरूपांचा वारसा घेऊन, ती रुजवून आपले स्वतःचे व्यक्तिगत आयुष्य सार्थकी लागले का, समृद्ध झाले का व आपल्या आजूबाजूचे जग, जे सुंदर आहेच, ते अधिक सुंदर, समृद्ध होण्यासाठी आपण झटतो का? प्रबोधिनीत शिकवलेल्या वरवरच्या गोष्टी राहिल्या पण ही खोलवरची वैचारिक–शिदोरी, टिकवली–वाढवली ना, हे समजणे मला महत्त्वाचे वाटते!

### परांडेवाड्यातील प्रबोधिनी



परांडे वाडा

आठवी-नववीच्या वर्षात मी मुंबईवरून पुण्याला मॉडर्न हायस्कूलमध्ये आलो होतो. आणि संध्याकाळच्या प्रबोध वर्गासाठी माझी निवड झाली. प्रबोधिनी आधी शाळा नव्हतीच. आधी फक्त प्रबोध वर्ग होते. जेव्हा प्रबोध वर्गात आता प्रशाला सुरू होणार असे सांगितले तेव्हा आमच्यापैकी काही पालकांनी या आगळ्या-वेगळ्या शाळेत धाडसाने मुलांना घातले हेच खूप मोठे भाग्य आहे. तेव्हा इतर शाळांमधील शिक्षकसुद्धा या शाळेत नक्की काहीतरी चांगले घडेल असा विश्वास देत होते. त्यामुळे तुमच्या मुलाला तिथे नक्की घाला असे सुचवत होते. म्हणून माझी ॲडमिशन प्रबोधिनीच्या पहिल्या तुकडीत झाली. मी नववीनंतर प्रबोधिनीत दाखल झालो. त्यामुळे आम्ही आठवी आणि नववी प्रबोध वर्गात आणि दहावी व अकरावी प्रशालेत शिकलो. हुशार मुलांना शिकवायला नामवंत शिक्षकही यायचे. एक केरळी प्रिस्ट इंग्रजी शिकवायला यायचे. प्रा. राजे बॉटनी शिकवायला यायचे. त्यांनी बीएस्सी, एमएस्सी ची पुस्तके लिहिली होती. सिंबायोसिसचे शां. ब. मुजुमदार यांनीसुद्धा आम्हाला वनस्पतीशास्त्र शिकवले. शाळेत विचारांना चालना देणे हेच खूप महत्त्वाचे असते. आप्पा स्वतः वर्गावर येऊन परिस्थितीज्ञानाचा तास घ्यायचे. नवनवीन पद्य शिकवली जायची. gymnastics, सहली असे बरेच उपक्रम सतत चालू असायचे. सुरुवातीला न्यू इंग्लिश स्कूलच्या वर्गांमध्ये प्रशाला सुरू होती. अगदी सकाळी न्यू इंग्लिश स्कूलच्या मुलांचे वर्ग भरायच्या आधी आणि संध्याकाळी त्यांचे वर्ग सुटल्या नंतर जेव्हा सगळे वर्ग मोकळे असायचे तेव्हा आमची शाळा भरायची. आप्पा आम्हाला त्यांच्या घरी राहायला ही बोलवायचे. प्रबोधिनी त्यांच्या घरीच होती. परांडे वाड्यातील तळमजल्यावर सुरुवातीला काही वर्ग व्हायचे. आप्पा मुलांना एस. एम. जोशी, आचार्य अत्रे, पु. ग. सहस्रबुद्धे अशांसारख्या मोठ्या लोकांना भेटण्यासाठी घेऊन यायचे. तेव्हा प्रबोधिनीत 'भरारी' म्हणून एक भिंतीवरील हस्तलिखित मासिक देखील असायचे. पंधरा-पंधरा किंवा वीस-वीस दिवसांची शिबिरे असायची. आणि हे सगळे घेणारे कार्यकर्ते हे आमच्यापेक्षा तीन-चार वर्षांनी मोठे असे सगळे होते. उदाहरणार्थ विसूभाऊ गुर्जर, अशोक निरफराके, रामभाऊ डिंबळे, इ. हे सर्व तेव्हा आमची वैचारिके, वाद-विवाद असे घडवून आणायचे. आपल्या प्रार्थनेमध्ये 'ही हिंदू भू परमश्रेष्ठ' या ओळीमध्ये 'हिंद' हा शब्द असावा की 'हिंदू' हा शब्द असावा यावरती एक वाद-विवाद झालेला मला व्यवस्थित आठवतो. इतर शाळांच्या तुलनेत अशा विलक्षण गोष्टी प्रबोधिनीत घेतल्या जायच्या. सर्वच पद्य देखील खूप हृदयस्पर्शी होती. या सर्वात काही मुले आनंदाने, उत्सुकतेने भाग घ्यायची पण काही थोडी अलिप्त रहायची. किंवा कधीतरी या सर्व गोष्टींवर विनोदही व्हायचे पण तो सगळा तेव्हा आमच्या लहानपणाचा भाग होता. आण्णांनी मला पोहायला शिकवले होते. सर्वांना पोहायला यायलाच पाहिजे असे त्यांचे मत होते.

आप्पांचे व्यक्तिमत्त्व हे एक ध्यास घेतलेले व्यक्तिमत्त्व होते. २४ तास ध्यास. ध्यास नसलेल्या स्थितीत त्यांना कधी बघितलेच नाही. काय कसं करायचे, काय-काय करायचे अस सगळं ते तळमळीने बोलत असायचे. सगळ्या विषयांवरची भरपूर माहिती त्यांच्याकडे होती. अत्यंत प्रभावी आणि प्रेरणादायी होते. आपल्याला काही तरी उन्नत, उत्तुंग आणि सुंदर घडवायचे आहे असे ते सतत बोलत. तेव्हा प्रबोधिनीची उपासना देखील घडत होती. त्यातही नवनवीन प्रयोग चालू असायचे. मानवी अस्तित्व हे खूपच क्षुल्लक आहे हे तेव्हा कळले. विश्व किती विराट आहे आणि आपण त्याचा कसा एक भाग आहोत असा विचार होत अध्यात्म विषयीचे कुतूहलही निर्माण झाले होते.

### आयआयटी खरगपूरमधील दिवस

७३ साली १२वी ची परीक्षा झाली. त्यानंतर लगेचच मी आयआयटी ची परीक्षा देऊन खरगपूरला गेलो. जे दिसते तेवढेच न शिकता जे दिसत नाहीये त्याबद्दलचे कुतूहल अधिक होते. त्यामुळे इलेक्ट्रॉनिक्स आणि टेलिकम्युनिकेशन ही शाखा मी निवडली. वेगवेगळ्या लहरी कशा तयार होतात, इकडून तिकडे हवेतून संदेश कसा काय जातो हे शिकण्याची, जाणून घ्यायची खूप इच्छा होती. प्रबोधिनीतून बाहेर पडल्यावर बाहेरच्या इतर मुलांपेक्षा आपल्या प्रशाळेतल्या मुलांच्या विचारांना जास्त धार आहे असे जाणवते. सांस्कृतिक, सामाजिक, धार्मिक आणि आत्मिकरित्या सुद्धा आपल्यात असलेली एक संवेदनशीलता जाणवायची.

आयआयटी खरगपूर मधले विश्व माझ्यासाठी खूपच वेगळे होते. वेगवेगळ्या विचारांचे वेगवेगळ्या सामाजिक स्तरांमधून आलेले विद्यार्थी एकत्र असायचे. प्रत्येकाची पार्श्वभूमी वेगळी होती. प्रबोधिनीतून शिकल्यामुळे ध्येयवादी विचारसरणी होती. आयआयटीमध्ये त्यामुळेच खूप वेगवेगळे बरेच काही शिकलो. इंग्लिश कसे बोलावे हे मुख्यतः शिकलो. प्रबोधिनीमध्ये विवेकानंदांच्या वाचनाचा माझ्यावर प्रभाव पडला होता पण आयआयटीत गेल्यावर अनेक नवीन विचारवंतांची पुस्तके आणि भाषणे ऐकली, अभ्यासली जसे की Ayn Rand, Alvin Toffler चे Future Shock हे पुस्तक आणि थर्ड वेव अशी अनेक. तिथे नवीन दृष्टिकोन कळले आणि विचारांचा आवाका वाढला. प्रबोधिनी मधून जे मूलभूत देशप्रेम धर्म-संस्कृती यांच्यावरचे प्रेम आणि जाण हे एक वेगळेच रसायन होते जे माझ्या बरोबरच्या विद्यार्थ्यांमध्ये ते तशा स्वरूपात कधी दिसलेच नाही. शेवटच्या वर्षाला असताना योगी कथामृत नावाचे पुस्तक वाचनात आले आणि त्याचा माझ्यावर खूपच प्रभाव पडला. त्यानंतर लगेचच मी त्या पुस्तकाच्या लेखकांना संपर्क करून जे पुस्तकात लिहिलेले आहे ते अधिक समजून घेतले. क्रियायोग शिकलो. त्याचा अभ्यास केला. जेव्हा सुट्टीनिमित्त पुण्यात यायचो तेव्हा आप्पांच्या बरोबर ही या संदर्भात संवाद व्हायचा. त्या काळात क्रिया योगाच्या अभ्यासाबरोबर अमेरिकेत जाण्याची तयारीही सुरू होती. आमच्या तीस जणांच्या अभियांत्रिकीच्या वर्गातून जवळ-जवळ अठ्ठावीस लोक नंतर अमेरिकेत नोकरी निमित्त गेले. ध्यानाच्या मार्फत माझा आध्यात्मिक प्रवासही सुरू झाला होता. तेव्हा आयआयटी खरगपूर मधूनच MTech करायचा मी निर्णय घेतला कारण मला क्रिया योगाचा अधिक सखोल अभ्यास करायचा होता. मायक्रोवेव इंजीनिअरिंग ही माझी एमटेकची शाखा होती. माझ्या या निर्णयाला आयआयटी मधील शिक्षकांनी देखील प्रोत्साहन दिले. सगळ्या वर्गानेच अमेरिकेत जाण्यापेक्षा भारतातील सरकारी नोकरी घेऊन भारतातच भारदस्त काम करावे असे त्यांचेही मत होते. कारण सरकारकडे नवीन तंत्रज्ञानाचे प्रकल्प होते, मोठ्या योजना होत्या. आणि मुख्य म्हणजे ती भारताची तेव्हा खूप मोठी गरज होती. त्यानंतर मी इंडियन इंजीनिअरिंग सर्व्हिसेसची परीक्षा दिली आणि १९८०मध्ये सरकारी नोकरीला लागलो.



**आयआयटी, खरगपूर**

### टेलिकम्युनिकेशन श्रेत्रात प्रवेश

त्या काळी भारत सरकारच्या असे लक्षात आले होते, की भारताला पुढे जायचे असेल तर टेलिकम्युनिकेशन क्षेत्रात प्रचंड मोठा विकास घडवून आणावा लागेल. इंग्रजांच्या काळी पोस्ट मास्टर जनरल असणे ही प्रतिष्ठेची बाब होती. कारण एका जागेवरून दुसरीकडे संदेश व्यवस्थित पोहोचणे हे वरवर वाटत नसले तरी खूप महत्त्वाचे असते. तसेच जेव्हा मी इंडियन टेलिकॉम सर्व्हिसेसमध्ये रुजू झालो तेव्हा तेवढेच महत्त्व टेलिफोन खात्याला आले होते. तेव्हा टेलिफोन घरात असणे अत्यंत दुर्मिळ होते. त्यासाठी टेलिफोन बुक करून सुद्धा अनेक वर्षं वाट बघावी लागायची. तेव्हा माझ्या सारख्या अनेक इंजीनिअर्सची नेमणूक करून सरकारला हे क्षेत्र वाढवायचे होते. भारत इलेक्ट्रॉनिक्स सारख्या एक-दोनच सरकारी कंपन्या टेलिफोन एक्सचेंज यंत्रे बनवत असत. त्यामुळे जितकी यंत्रे तयार होत तेवढीच देशभरात सगळीकडे पाठवावी लागत. त्यामुळे अत्यंत धीम्या गतीने टेलिफोन भारतभर पसरत होता. मागणी प्रचंड पण पुरवठा अत्यंत कमी अशी तेव्हाची स्थिती होती.



**उरण येथील ऑफशोअर टू ऑनशोअर प्रकल्प – १९८३ – सॅटलाईट अर्थ स्टेशन – डिजिटल टेक्नॉलॉजी**

त्याच काळात भारतात नवीन सॅटेलाइट प्रणाली बसवणे सुरू होते. १९८३-८४ च्या काळात भारताने इंडियन नॅशनल सॅटेलाइट इन्सॅट हा उपग्रह अंतराळात सोडला होता. त्या सॅटेलाइट कम्युनिकेशनचे टेस्टिंग मला करायला मिळाले होते. त्यातील टेस्टिंगसाठी गोवा, अंदमान, भूतान, सिक्कीम, मध्य प्रदेश अशा भारतातल्या वेगवेगळ्या भागातून सॅटेलाइटचे टेस्टिंग, चॅनेल सेटप करणे असे केले. त्यामुळे जिथे अजून टेलिफोन वायर पोचल्याच नाहीत जसे की अंदमान, ते भाग मुख्यतः जोडले गेले.

## ईशान्य भारतातील परिस्थिती



रिपिटर टॉवरसाठी जागेची पाहणी



ईशान्य भारतात झपाट्याने टेलिकम्युनिकेशन सुविधा पोचवण्यासाठी साधारण १९८४च्या काळात भारत सरकारने एक मोठा टास्क फोर्स बनवला. मी या टास्क फोर्समध्ये डिव्हिजनल इंजीनिअर टेलिकॉम प्रॉजेक्ट म्हणून जोरहाट (आसाम) येथे पदभार स्वीकारला. तिथे टेलिकम्युनिकेशनची खूपच दुर्दशा होती. इतकी वाईट परिस्थिती की तिथे ऑटो exchanges च नव्हते. तेव्हा मणिपूरच्या मुख्यमंत्र्यांना जेव्हा-जेव्हा भेटायचो तेव्हा ते म्हणायचे की जरा काहीतरी करा, मी इथून कॉल लावला आणि ऑपरेटरने कॉल जोडून दिला तरच दुसरीकडे कॉल जायचा. नाही तर तुमचा इतर जगाशी संपर्क होऊ शकत नाही. ऑपरेटर जागेवर नसेल तर तुम्हाला वाट बघण्याशिवाय काही पर्याय नसायचा आणि हे तिथे मुख्यमंत्र्यांच्या बाबतीत ही व्हायचे. डिव्हिजनल इंजीनियर टास्क फोर्सच्या अंतर्गत मला आसाम, नागालँड, अरुणाचल प्रदेश आणि मणिपूर असे क्षेत्र मिळाले होते. तिथे टेलिफन एक्सचेंज बसवण्याचे व एक्सचेंजेस जोडण्यासाठी वायरलेस लिंक उभारण्याचे काम मुख्यतः केले. सर्वप्रथम जागेची पाहणी करून सिव्हिल इंजीनिअरच्या मदतीने repeater टॉवर आणि एक्सचेंजेस यांचे रस्ते बनवण्यापासून सुरुवात होती. काही भागात दरवर्षी पूर येतो. त्यासाठीची व्यवस्था लावणे हे ही करावे लागले. काही-काही ठिकाणी तर चक्क बांबूने संपूर्ण ऑफिस बांधून आम्ही टेलिफोन एक्सचेंज सुरू केले. जेवढी भारतभरात टेलिकम्युनिकेशनची कामे होत होती तेवढीच किंबहुना त्याहून अधिक कामे ही टास्क फोर्स नॉर्थ ईस्ट भागात करीत होती. हे करताना अनेक समस्या आल्या. काही वेळा नागा लोक काम करीत नसत किंवा रिपीटर टॉवरच स्वीच ऑफ करून टाके. आणि रोजगार वाढवा, कायम स्वरूपी कामगार म्हणून घ्या अशा मागण्या करीत. तिथे बहुतांशी ख्रिश्चन लोक आहेत आणि धार्मिक ही आहेत. त्यामुळे त्यांच्यातल्या धार्मिक भावनेला, तत्त्वांना आवाहन करून हे सर्व प्रश्न सोडवावे लागले. तेव्हा आसाम मध्ये ULFA संघटना बॉम्बस्फोट ही घडवून आणत त्यामुळे घरचे सर्वच चिंतेत असत. पण त्यानंतर आसाम गण परिषदेचे राज्य आले तेव्हा कुठे त्या भागात जरा शांतता होती. तरीही पुढे नागालँड आणि मणिपूरमध्ये इमर्जन्सी होतीच. तेव्हा भारतीय सैन्य दलाच्या मदतीने बरेच काम केले. आर्मीला देखील टेलिकम्युनिकेशन सर्व्हिसेसची बरीच गरज असते. ही सर्व सीमावर्ती राज्ये बघता त्याचे महत्त्व आणि गरज अजून वाढते. जर प्रबोधिनीची देशप्रेमाची शिकवण नसती तर हे अवघड काम कदाचित नसते झाले. आमचे टास्क फोर्सचे जनरल मॅनेजर जे होते त्यांचे व्यक्तिमत्त्व सुद्धा अत्यंत देशप्रेमी व समर्पित असे होते. या काळातच मा. आण्णा आमच्या जोरहाटच्या ऑफिस कम रेसिडेन्समध्ये येऊन, आमचे काम पाहून आणि पाठीवर कौतुकाची थाप मारून गेले ही हृद्य आठवण आहे.

त्यानंतर भारतात मायक्रोवेव्ह कम्युनिकेशन प्रणाली बसवणे सुरू झाले. त्यासाठी जर पुण्याहून मुंबईला कॉल करायचा असेल तर मध्ये ३०-३० ते ४०-४० किलोमीटर वर रिपीटर टॉवर बसवावे लागतात. मायक्रोवेव्हच्या लाइन ऑफ साईट नुसार पृथ्वीच्या curveture चा विचार करून हे टॉवर उभारावे लागतात. तर त्यासाठी मायक्रोवेव्ह सर्वे करावा लागे. त्याच नावाच्या स्वतंत्र खात्याचा मी एक भाग होतो. अक्षरशः भारतभर ठिकठिकाणी फिरून असे अनेक सर्वे आम्ही केले आणि रिपीटर टॉवर्सचे जाळे विणले.

## हॉलंडमधील प्रशिक्षण - ऑप्टिक फायबर तंत्रज्ञान

त्यानंतर जानेवारी १९८६ मध्ये पुढच्या काही शिक्षणासाठी सहा महिन्यांकरिता मला हॉलंडला पाठवले होते. आश्चर्यकारक घटना म्हणजे तेथील फिलिप्स इंटरनॅशनल टेलिकॉम ट्रेनिंग सेंटरचे प्रिन्सिपल जेव्हा भेटले तेव्हा ते म्हणाले की Indian people are very intelligent, I know! आणि तेव्हाची भारतातली परिस्थिती बघता आपण जागतिक पटावर फारच मागे होतो तरीही असे परदेशी लोकांचे स्तुतीपर उद्गार ऐकून बरे वाटले. ऑप्टिक फायबर हा विषय नव्याने मी तिथे शिकलो. त्यावर अजून संशोधन चालू होते. एकदा एका प्रोफेसरने वर्गात सांगितले, की मी उद्या तुम्हाला एक महत्त्वाची माहिती असलेले

पुस्तक देणार आहे. आणि दुसऱ्या दिवशी त्यांनी एका भारतीय इंजीनिअर ने प्रकाशित केलेल्या रिपोर्ट/paper वर आधारित पण त्या आंतरराष्ट्रीय संस्थेने छापलेले पुस्तक वर्गात दिले. नवीन केबल टाकताना कोणत्या केबल मधून जास्त चॅनेल टाकावेत याची निवड कशी करावी म्हणजे चांगला संपर्क होऊ शकेल हे त्यात दिलेले होते. तेव्हा असे मनात येऊन गेले की आपण आंतरराष्ट्रीय दर्जाचे शिक्षण घेण्यासाठी एवढ्या लांब येतो पण भारतीय लोकांची क्षमता, बुद्धी आणि तंत्रज्ञान हे इतके सखोल आहे की जगातील इतर देशातील संस्थांनाही या ज्ञानाचा वापर करून घ्यावासा वाटतो हे खरच अभिमानास्पद आहे. भारतात वैयक्तिक पराक्रम करणारे अनेक जण असतात. पण एखादे तंत्रज्ञान किंवा एखादा प्रोजेक्ट पुढे नेण्यासाठी अनेकांना अनेक वर्षे झटावे लागते. एकत्र काम करावे लागते. फक्त individual brilliance पूरत नाही. ते परदेशांमध्ये भारतापेक्षा सहजतेने होते. अशी सर्वांच्या सहभागाने एकत्रित काम करायची गरज भारतात जास्त आहे.



**हॉलंड येथील ऑप्टिकल फायबर टेक्नॉलॉजी लॅब**

मी MTech करत असताना शिकलो होतो की फायबर ऑपटिक्स हे तंत्रज्ञान काही feasible नाही. कारण त्यात खूप losses होत असतात. केवळ १०० मीटर लांब सिग्नल त्यातून पुढे जाऊ शकतो. आणि मग म्हणून त्यासाठी भरपूर सिग्नल boosters वापरावे लागतात, त्यामुळे ते खूप खर्चिक होऊन जाते. ऑप्टिक फायबरचा पहिला प्रयोग हा पुण्यातच झाला होता. टेलिकॉम रिसर्च सेंटर नावाची भारत सरकारची एक संस्था आहे. १९८०च्या सुमारास त्यांनी एक नवीन fibre material वापरून नवीन तंत्रज्ञानाचा प्रयोग केला होता. ऑपटिक फायबरची नवीन लाइन टाकली होती. त्यात भरपूर repeaters लावले होते. पण आता ऑपटिक फायबरचे losses इतके कमी झाले आहेत की त्या मानाने coaxial cable मधले losses खूप वाटतात. तांब्याच्या तारेपेक्षा आता फायबर स्वस्त ही आहे. मी असा copper cable मधून कॉल लावणे ते सॅटलाईटद्वारे कॉल करणे ते समुद्रातून सुद्धा पसरलेल्या ऑपटिक फायबरद्वारे कॉल करणे असा भारताच्या विकासाचा पट अनुभवला आहे. या technological transitions प्रत्यक्ष बघितल्या आहेत. आता घरोघरी कम्प्युटर्स असतात. एवढी मोठी कम्प्युटेशनल पॉवर घरीही लागेल असे कोणालाही तेव्हा वाटले नव्हते. आधी वाटायचे की एवढ्या मोठ्या डेटाचे काय करायचे? काय त्याचा उपयोग? पण आत्ता कुठे त्याचे उत्तर मिळाले. लॅपटॉप आणि मोबाईलमध्ये याच प्रचंड डेटाच्या आधारे आपण बऱ्याच गोष्टी सहजरित्या करतो आणि चालवतो. या सर्व प्रवासात, सामाजिक बदलती परिस्थिती आणि देशाचा विकास याचा एकमेकांवर होणारा परिणाम ही बघितला.



**हॉलंड येथे ट्रेनिंगसाठी गेलेले भारतीय व पाकिस्तानी अधिकारी**

## विस्तारलेले अनुभवविश्व

नेदरलँड्स वरून परत आल्यावर काही काळ मी मुंबईमध्ये होतो. त्यानंतर एमिरेट्स टेलिकॉम कॉर्पोरेशन, दुबईमध्ये रेडिओ इंजीनिअर म्हणून तीन वर्षे काम केले. तेव्हा दुबईमध्ये मोबाईल वापरले जायचे. भारतात तोपर्यंत मोबाईल नव्हते आले. आणि हे सुरुवातीचे मोबाईल खूप अवजड मोठे असायचे आणि त्यांची बॅटरी खांद्यावर घेऊन चालावे लागायचे. तेथे बहुतांश इंजीनियर्स हे ब्रिटिश होते. त्या नंतर साधारण चार वर्षांनी मी भारतात परत आलो. तेव्हा भारतात नवीन म्हणजे रूरल रेडिओ कम्युनिकेशन सुरू होत होते. त्यामुळे याच प्रोजेक्टमध्ये माझी डेप्युटी जनरल मॅनेजर म्हणून नियुक्ती झाली. तेव्हा महाराष्ट्र सर्कल हा मला माझ्या कामासाठी दिला गेला होता. त्यानंतर वेगवेगळ्या जिल्ह्यांमध्ये रायगड, सांगली, अहमदनगर अशा ठिकाणी मी मुख्य टेलिकॉम जनरल मॅनेजर म्हणून होतो. अहमदाबादमध्ये पण मोबाईल टेलिफोन व्यवस्थेचा जनरल मॅनेजर होतो. पुढे टेलिकॉम कन्सल्टंट इंडिया लिमिटेड मध्ये डेप्युटेशनवर रुजू झालो. भारत सरकारने १९७५ला काढलेली कंपनी आहे. बाहेरच्या देशांची टेलिकम्युनिकेशनची





**कतार येथील एशियन गेम्स – २००६**





**सांगली येथील एका सांस्कृतिक कार्यक्रमात –आण्णा हजारे, मधुमंगेश कर्णिक यांच्या समवेत**




**नगर येथील सांस्कृतिक कार्यक्रमात – सदाशिव अमरापूरकर यांच्या समवेत**



**पुणे जिल्ह्यातील एका टेलिफोन एक्सचेंजच्या उद्घाटन प्रसंगी कर्मचाऱ्यांबरोबर पाहणी करताना**

कॉन्ट्रॅक्ट घेऊन ती कामे पूर्ण करणे असे काम असते. पूर्ण कुवेत, पूर्ण ओमानची संपूर्ण अंडरग्राउंड टेलिकम्युनिकेशन यंत्रणा या कंपनीद्वारे भारताने बसवली. २००६च्या कतारमध्ये झालेल्या एशियन गेम्ससाठी सर्व तीस–चाळीस स्टेडियम मधील कम्युनिकेशनच्या मेंटेनन्सच्या प्रोजेक्टसाठी मी प्रोजेक्ट डायरेक्टर होतो. कतारमधील एशियन गेम्स झाल्यानंतर दुबई टेलिकॉमसाठी काही काम केले. तेव्हा मी रिजनल मॅनेजर म्हणून अबुधाबी, शारजा, दुबई अशा शहरांचे काम केले. जसे आत्ता आयटी सेक्टर मधली कामे भारतीय कंपन्यांना मिळतात तसेच टेलिकॉम मधली ही कामं सुध्दा भारतीय कंपन्यांना आंतरराष्ट्रीय स्पर्धेला तोंड देऊन भारतीय तंत्रज्ञांच्या मदतीने यशस्वीपणे पूर्ण करीत आहेत.

## नैतिकतेची भूमिका आणि संघटन

काम करीत असताना प्रबोधिनीशी संपर्क राहिलेला नव्हता. तशी काही सोय/Avenue ही नव्हती आणि माझ्याकडून देखील काही विशेष प्रयत्न झाले नाहीत. माझ्या समविचारी वरिष्ठांकडून मला एक गोष्ट नक्की कळली की आपल्या सोबत काम करणाऱ्या लोकांचा दृष्टिकोन बदलवणे हेच खूप significant आणि महत्त्वाचे काम असते. एकदा तो दृष्टिकोन तयार झाला की ती माणसे देशासाठी अविरत काम करू शकतात आणि करत राहतात. ती प्रेरणा त्यांना मिळत राहते. **दुबई वरून आल्यावर पुण्यात जीएम (ॲडमिन) असताना माझ्या ऑफिसमध्ये सकाळी आल्या–आल्या साडे नऊ वाजता सर्व प्रथम कॉन्फरन्स रूममध्ये सर्वांनी जमून कॅसेट लावून 'इतनी शक्ती हमे देना दाता, मन का विश्वास कमजोर न होगा' हे गीत एकत्र म्हणायचो. या वेळेस सर्व ऑफिसर्स एकमेकांना दिसायचे, आणि गटाची एक अस्मिता तयार होण्यास मदत व्हायची. सर्वजण समोरासमोर समान पातळीवर एकमेकांना बघतात. प्रसन्न मनाने दिवसाची सुरुवात करतात. हा मोठा हा लहान असा भाव जो अजाणतेपणी ऑफिसमध्ये तयार होत असतो तो भाव एवढासा जरी वेळ एकत्र घालवला तरी कमी होतो. आणि त्या गीता मधले भाव ही कुठल्या ना कुठल्या माध्यमातून कृतीत उतरतात. त्या गीता मधली ही एक ओळ मला फार आवडते, 'हम न सोचे हमे क्या मिला है, हम ये सोचे किया क्या है अर्पण'. आणि हेच गाणे लावून नंतर अनेक वेगवेगळ्या ऑफिसेस मध्ये अशी दिवसाची सुरुवात करणे चालू झाले. हे नैतिकतेचे गीत आहे.**

आपली प्रबोधिनीची उपासना आणि प्रार्थना दोन्हीही आहेत. पण तरी आपण कोणी फार त्याकडे लक्ष दिले नाही असं मला नक्की वाटतं. एकदा का तुमची मूळ भूमिका ही नैतिक मूल्यांवर आधारित आणि राष्ट्रप्रेमी बनली की तुम्हाला काम करणे ही खूप सोपे होऊन जाते. आणि भाग्याने मला तसेच समविचारी सहकारी आणि ज्येष्ठ मार्गदर्शक लाभले. सरकारतर्फे उत्तम–उत्तम मॅनेजमेंट कोर्सेससुद्धा करवून घेतले जातात. शिव खेरा वगैरे लोकांची व्याख्याने आयोजित केली जातात. पण माझ्याकडून जे काही काम आजपर्यंत झाले ते प्रबोधिनीच्या विचारांच्या धर्तीवरच झाले हे नक्की.

वडिलांच्या आजारपणामुळे मला पुण्यात रहाण्याची आवश्यकता होती म्हणून दिल्लीतील मंत्रालयात पोस्टिंग न घेता मी भारत ब्रॉडबँड नेटवर्क लिमिटेड (BBNL) या सरकारी कंपनीत प्रति नियुक्तीवर येऊन तिथूनच चीफ जनरल मॅनेजर ऑफ वेस्टर्न रिजन या पदावरून २०१५मध्ये निवृत्त झालो. या कंपनीद्वारे सरकारच्या खूप महत्त्वाकांक्षी योजना भारतात राबवल्या जातात. जसे की भारतातील सर्वच्या सर्व गावे ही फायबर केबलने जोडून घ्यायची. भारतामध्ये एकूण गावांचा आकडा सहा लाखांपर्यंतचा आहे. जेव्हा या सर्व सहा लाख ग्राम पंचायती जोडल्या जातील तेव्हा याचा खूप मोठा फायदा भारताला होणार आहे.

**धियो योनः प्रचोदयात**

याला समांतर माझा अध्यात्मिक क्षेत्रात ही प्रवास सुरू होता. क्रियायोगाचे शिक्षण, आचरण आणि प्रसार, १९८६ पासून हरिद्वारच्या गायत्री परिवाराचे काम असे सुरूच होते. श्रीराम शर्मा म्हणून एक सत्पुरुष होऊन गेले. त्यांनी 'अखंड ज्योति' नावाचे मासिक १९३९ सालापासून चालवले. त्या मासिकाद्वारे प्रत्येक माणसाचे आयुष्य कसे प्रेरणादायी आणि गायत्री मंत्रात म्हणल्या प्रमाणे 'धियो योनः प्रचोदयात' (बुद्धीला प्रचोदना मिळो) असे घडवावे, हे सांगणारा हा मंत्र संपूर्ण भारतीय हिंदू संस्कृतीचे सार आहे. १९८६ साली मी त्यांचे आत्मचरित्र वाचले. आणि ते वाचून आपले प्रबोधिनीचे विचार आणि त्यांच्या विचारात बरेच साम्य आढळून आले. त्यामुळे मी त्यांना प्रत्यक्ष जाऊन भेटलो. १९९०मध्ये त्यांचे निधन झाले. पण त्यांच्या आयुष्याच्या शेवटच्या दोन वर्षांत त्यांनी खूप साहित्य लिहिले आणि त्याला नाव ठेवले 'क्रांतिधर्मि साहित्य'! क्रांती कोणती तर युग परिवर्तन करणारी क्रांती. आत्ता आपण राहतो त्या समाजाची एक स्थिती आहे, पठडी आहे. त्यातच आपला समाज वर्षानुवर्षे राहत असतो. यामधून अजून चांगली स्थिती ही सन २००० नंतर येईल, तेव्हा युग परिवर्तनाला सुरुवात होईल असे त्यांनी सांगितले. आणि त्या परिवर्तनाच्या प्रक्रियेचा भाग म्हणून ज्या-ज्या लोकांना याची जाणीव होईल त्यांनी अखंड अविरत चांगली कामे करीत राहावी असा संदेश त्यांनी त्यातून दिला आहे. 'हम बदलेंगे, युग बदलेगा; हम सुधरेंगे युग सुधरेगा!' असं त्यांचं सांगणं होतं. सगळ्या क्षेत्रात माणसांनी नक्की कशासाठी काम करावं, पैशासाठी की प्रतिष्ठेसाठी की अजून कशासाठी, काय उद्देश असावा असे ढवळून टाकणारी वैचरिके त्यांनी त्यात लिहिलेली आहेत. याच्याच सोबतीला त्यांनी भारतीय संस्कृतीतील सोळा संस्कार पुनः प्रस्थापित करायचा प्रयत्न केला. गायत्री मंत्राचा व त्यामधील तत्त्वज्ञानाचा प्रचार खेडोपाडी केला. त्यांचे साहित्य हिन्दी भाषेत आहे. त्या साहित्याचा मराठी अनुवाद मी गेली अनेक वर्षे करीत आहे. मी रोज एका पुस्तकाचा सारांश लिहून पाठवतो आणि तो रोज एक ऑडिओ-विडियो बनवून यूट्यूब किंवा फेसबूक वर प्रकाशित केला जातो. अशी एकूण ३००० पुस्तके आहेत. रोज एक म्हटले तरी किमान दहा वर्षे या कामाला लागतील एवढे मोठे काम आहे. या सर्व गोष्टीचा उद्देश म्हणजे केवळ वैचारिक क्रांति एवढाच आहे. मुख्यतः उत्तर भारतात म्हणजे पंजाब, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश, हरियाणा या भागात या संस्थेचे बरेच काम चालते. हजारो कार्यकर्ते काम करतात. अमेरिका, युरोप सारख्या परदेशातही आपल्या संस्कृतीचे समर्पक आणि विज्ञाननिष्ठ स्वरूप मांडण्याचे काम गायत्री परिवार करतो. मी परिवाराचे काम मोठ्या आवडीने करतो. प्रबोधिनीच्या संत्रिका विभागात तयार झालेल्या पोथ्या आणि पुस्तके देखील याच प्रकारची आहेत.





**हरिद्वार येथील विराट यज्ञ – गायत्री परिवार**



**संगीतकार यशवंत देव यांच्याबरोबर गायत्री परिवारासाठी गाण्यांचे रेकॉर्डिंग**



**ग्रामीण भागातील एक यज्ञ**

**पतंजली योग समितीचे कार्य**

मी रामदेव बाबांच्या पतंजली योग समितीचा ही सदस्य आहे आणि मुख्य योग शिक्षक म्हणून देखील पात्रता अर्जित केली आहे. पतंजलीचे उद्दिष्टही व्यक्तीमधील परिवर्तन हेच आहे परंतु त्याची सुरुवात ते योग साधनेपासून करतात. कारण ते

समजायला आणि करायला सोपे आहे. रामदेव बाबा हे फक्त योग साधनेत गुंतलेले नसून त्यांना आपल्या शिक्षण पद्धतीमध्ये अमूलाग्र बदल घडवून आणायचे आहेत. आपली संस्कृती आणि आपले संस्कार हे आताच्या शिक्षण पद्धती मधून नवीन पिढी कडे पोचतच नाहीत हीच समस्या त्यांना दूर करायची आहे. जसे दिल्लीचे सीबीएसई आणि महाराष्ट्राचे एसएससी बोर्ड आहे तसेच त्यांना एक भारतीय शिक्षा बोर्ड सुरू करायचे आहे. त्या अंतर्गत ज्या-ज्या शाळा या बोर्डाला जोडलेल्या असतील या शाळांमध्ये वैदिक शिक्षण घेण्याची सोय असेल. सगळ्याच शाळा अशाच असल्या पाहिजे असे नाही पण निदान तसा पर्याय तरी भारतात असला पाहिजे. इंग्रजांनी भारताचा ताबा घेण्यापूर्वी जी आपली शिक्षण पद्धती होती यामध्ये व्यवस्थित नैतिक आणि सांस्कृतिक गोष्टी शिकवल्या जात. पण आता समाजात त्याची उणीव भासते. असेच गायत्री परिवाराचे विश्वविद्यालय देखील आहे. या विद्यालयाचे वेगवेगळ्या सत्तर देशांशी करार (MoU) झाले आहेत. जेव्हा Lithuania सारख्या देशातील काही नागरिक भारतात येतात तेव्हा तेही म्हणतात की आमच्या संस्कृतीतही तसेच सर्व आहे.

### सर्व क्षेत्रांतले गुरू

माझ्या आयुष्यात मला अनेक गुरू लाभले. जगात स्वतंत्र विचार करणाऱ्या खूप व्यक्ती असतात पण विचारासोबत आचार करणाऱ्या व्यक्ती दुर्मिळ असतात. पहिले गुरू म्हणजे आपले आप्पा !! आप्पांची प्रेरणा आणि तळमळ त्यांच्या कृतीमुळे आमच्यातही काही अंशी उतरली. नंतर पुढे नोकरीच्या ठिकाणीही देशप्रेमी आणि सक्षम अधिकारी भेटले. आदर्शांना विसरा असे सांगणारे अनेक होते, पण आपल्या नैतिकतेला प्रतिसाद देणारे, समर्पित भावनेतून काम करणारेही भेटत राहिले. त्यांच्याबरोबर काम करताना अत्यंत आनंद होतो. अशाच ऑफिसर्स पैकी एक म्हणजे आर.एल. दुबेजी. त्यांचा सतत असा आग्रह असे, की इलेक्ट्रिशियन, ऑपरेटर अशा सर्वांशी मॅनेजमेंटचा संवाद व्हायला पाहिजे. फक्त ऑर्डर किंवा पनिशमेंट देऊन काहीच उपयोग नाही. त्यानंतर मी जनरल मॅनेजर असताना पुण्यातील तीन हजार स्टाफचा असा मोठा रिव्ह्यू घेतला. रोज पंधरा-पंधरा लोकांशी मॅनेजमेंटचा संवाद होतच असे. त्यात त्या लोकांना प्रोफेशनल फायनान्शिअल अशा सर्व प्रकारची मदत व सल्ला दिला जाई. हा संपूर्ण प्रोग्रॅम मी दोन वर्षांत पूर्ण केला. आर. एल. दुबे यांच्याप्रमाणेच दुसरे एस्. पी. सोवनी, जनरल मॅनेजर टास्क फोर्स, हे अत्यंत समर्पित व्यक्तिमत्त्व होते. नॉर्थ ईस्ट मधले सर्व प्रकल्प पूर्ण करण्याचा त्यांनी दिवस-रात्र ध्यास घेतला होता. अशा ध्येयवादी, समर्पित अधिकाऱ्यांबरोबर काम करण्याची ज्यांना-ज्यांना संधी मिळाली ते आम्ही सर्वजण संपूर्ण करिअर मध्ये ignited minds असलेले राहिलो !

अध्यात्मिक क्षेत्रात परमहंस योगानंद यांचे मी पुस्तक वाचले 'Autobiography of a Yogi'. Its all time classic book. युगपरीवर्तन या विषयावर आचार्य श्रीराम शर्मा यांनी अफाट लेखन केले. एकाच माणसाने एवढे लिहिले असे आपल्याला खरेच वाटत नाही. पुस्तकातूनही मी बऱ्याच गोष्टी शिकलो. थोरामोठ्यांची बरीच पुस्तक मला वाचायला मिळाली.

### प्रवासातून संस्कृतीदर्शन


कामानिमित्त देशभर प्रवास झाला. प्रवासाची मला आवडही होती. आणि मुख्य म्हणजे या सर्व वर्षांमध्ये माझी पत्नी सौ. वीणाचीही मला भरपूर साथ मिळाली. माझी पत्नी सौ. वीणा ही लग्नाच्या आधी 'मंतरलेल्या चैत्रबनात' या भावगीतांच्या कार्यक्रमातील प्रथितयश गायिका होती. लग्न झाल्यानंतर दोन महिन्यातच आसाम/नागालँड येथे डिव्हिजनल इंजीनिअर म्हणून नेमणूकीती बातमी आली. त्यामुळे दोघांनाही लगेच तिकडे जावे लागले. या सर्व काळात सौ. वीणाने स्वतःचा सांगीतिक प्रवासही चालू ठेवला. आसाममध्ये आसामी गाणी शिकून घेतली. मुंबईला परतल्यावर 'मेरी आवाज सुनो', 'सारेगम' अशा विविध हिंदी आणि मराठी टीव्ही कार्यक्रमातून ती यश मिळवत राहिली. माझ्या कवितांचे पुस्तक प्रकाशित करणे आणि त्या पैकी काही गाण्यांच्या ध्वनिफिती असे उपक्रमही तिने सहज पार पाडले. आणि या सरकारी नोकरीत आमच्या घरातील हिकवळ जिवंत ठेवली. आसाममध्ये इतकी वर्षे राहण्याचा अनुभव ही खडतर होता. भयंकर डास, पूर यायचे, वीजपुरवठा खंडित व्हायचा, इन्फ्रास्ट्रक्चर नव्हते, प्रचंड महागाई होती. काम करताना त्या मागची माझी भावना ही राष्ट्र सेवेची होती. पण या सर्व अधिकाऱ्यांची अशीच असते असे नाही. काहीजण केवळ चांगली नोकरी मिळवायला, काहीजण अधिकार गाजवायला येत असतात. त्यामुळे मला अविनाश धर्माधिकारी यांचे विशेष कौतुक वाटते. भावी सरकारी अधिकाऱ्यांना चांगले मार्गदर्शन देणे, राष्ट्र सेवेची प्रेरणा देणे, आणि हे सर्व सातत्याने इतकी वर्षे करत राहणे हे



**पत्नी सौ. वीणाबरोबर**

अजिबात सोपे नाही. आपले प्रबोधिनीचे स्पर्धा परीक्षा केंद्र ही तेवढ्याच ताकदीने काम करते हे बघून बरे वाटते.

आसाममध्ये काम करताना तेथील संस्कृती समजून घेता आली. तेथील लोकांचे चेहरे हे थोडेफार mongoloid features चे असतात. तेथील लोक हे जेव्हा भारतातल्या जाहिराती बघतात तेव्हा त्यामध्ये त्यांच्या सारखे दिसणारे कोणीच नट नसतात. परंतु जेव्हा काही चायनीज, कोरियन, ब्रूस ली च्या जाहिराती त्यांना बघायला मिळतात तेव्हा त्यामध्ये दिसणारे चेहरे त्यांच्याशी अधिक जवळचे आहेत हे बघून त्यांना त्या जाहिरातींशी जवळीक वाटते किंवा त्यांच्याशी रिलेट होणाऱ्या वाटतात. त्यामुळेच आसाममधल्या जाहिरातींसाठी आसामी लोकच त्यामध्ये वापरावे असे होणे गरजेचे आहे. नागालँड मधले लोक तर चक्क तुम्ही भारतातून आलात काय असे विचारतात. नागालँड मध्ये हिंदी व्यवस्थित बोलली जाते. पण ख्रिश्चन मिशनऱ्यांमुळे ते थोडे भारतापासून दुरावलेले वाटतात. आणि आश्चर्य म्हणजे एकदा मला तेथील एक रहिवासी म्हणाला होता की we people are from the hills. And we are originally from America! मिशनरी जे सांगतात ते हे ऐकतात. तेथील लोकांना हे मिशनरी स्कॉलरशिप वगैरे मिळवून देऊन अमेरिकेला काही कोर्सेस करायला देखील पाठवतात. येथील अजून एकाशी जेव्हा संवाद झाला तेव्हा तो म्हणाला की I was in USA for three months to learn carpentry. १९८०च्या दशकात अमेरिकेमध्ये राहायला जाणे ही काही फार सोपी गोष्ट नव्हती. बराच खर्च असायचा आणि तरीही नागालँड मधील एका गावातील एक सामान्य नागरिक अमेरिकेला जाऊन राहून येतो आणि सुतारकाम शिकून येतो! असे सर्व होत असताना तेथील लोकांना आपण भारतीय आहोत असे कसे काय वाटणार. तसे शिक्षणही भारतात आपण लहान मुलांना देत नाही. आसाम मधील माणूस कसा दिसतो, तेथील संस्कृती काय या शालेय वयातच शिकवायच्या गोष्टी आहेत. त्यामुळे एखादा आसामी माणूस जर आपल्या समोर असेल तर आपल्यालाही तो थोडासा परका आणि वेगळा, उठून दिसणारा वाटतो जे की वाटायला नको. मी आयआयटी मध्ये असताना आमच्या वर्गामध्ये एक मणिपूरचा विद्यार्थी होता. तो रामकृष्ण मिशनची पुस्तके वाचायचा. मणिपूरच्या शहरांमध्ये वैष्णव पंथीय लोक राहतात. त्यांची नावे सुद्धा थोयबा सिंग वगैरे असतात. परंतु बाकी सर्व गावात व आदिवासी भागात ख्रिश्चन धर्मीय लोक राहतात. या माझ्या वर्ग मित्र एकदा त्याच्या गावातील आठ-दहा मुलांना भारत भ्रमणसाठी कन्याकुमारी पर्यंत घेऊन गेला. तेथील विवेकानंद केंद्र त्यांनी बघितले. पुढे त्रिवेंद्रमच्या मंदिरात जात असताना त्यांना अडवले गेले, परदेशी नागरिकांना जायची परवानगी नाही म्हणून. एवढी मोठी त्रुटी आपल्या शिक्षण प्रणालीमध्ये आहे. लोकांना माहीतच नाही की मणिपुरी लोक कसे दिसतात. असे सर्व असताना नॉर्थ ईस्ट मधील लोकांना आपण परकीय वाटणे यात काहीच नवल नाही. त्यामुळे त्यांना बाहेर जाऊन नोकरी करणे हे देखील फारसे आवडत नाही. आपल्या पुस्तकांमध्ये एवढे जरी असले की हे लोक कसे दिसतात ? कुठले आहेत ? अशी थोडी जरी ओळख असली तरी खूप मोठे काम होईल.



**एका निवांत क्षणी गिरनारवर**

**समाधानाचे अनेक प्रसंग**


कतारमध्ये एशियन गेम्स संपल्यानंतर तेथील राष्ट्र प्रमुखांनी एका मोठ्या कार्यक्रमात सर्व सहभागी संस्थांचा सत्कार व अभिनंदनाचा कार्यक्रम केला. सर्व जगभर टीव्हीच्या माध्यमातून खेळांचे प्रक्षेपण करण्याची जबाबदारी तेथील टेलिकॉम खात्याकडे होती. त्यांनी त्यांच्या सत्कारात आपला भारतीय टेलिकॉमच्या तज्ज्ञांच्या मदतीचा कृतज्ञतापूर्वक उल्लेख केला. तो वेगळा समाधानाचा क्षण होता. भारत ब्रॉडबँड लिमिटेड या संस्थेमध्ये काम करताना भारतभर ब्रॉडबँडचे जाळे कसे पसरवायचे याचे तंत्रज्ञान, यंत्रणा, नियम, रचना बसवणे या कामासाठी योजलेल्या समितीत मीही एक सदस्य होतो. त्या काळात दिल्लीला अनेक भेटी झाल्या. या समितीचा सदस्य म्हणून महत्त्वाची
भूमिका व योगदान करू शकलो याचे ही समाधान आहे. म्हणावे इतक्या वेगाने त्याची कार्यवाही आपण देशभरात करू शकलो नाही. आमच्या संस्थेची भूमिका ही सल्लागार म्हणून होती. कार्यवाही करण्याचे काम अन्य शासकीय संस्थांकडे होते. त्याठिकाणी काही मर्यादा येत गेल्या. सांगली, नगर येथे जनरल मॅनेजर म्हणून १९९९ ते २००० या काळात असताना केवळ शासकीय व तांत्रिक कामांच्या पलीकडे जाऊन




**सेन्ट्रल गव्हर्नमेंट असोसिएशन, सांगली यांचा एक कार्यक्रम**



**रोटरी क्लबतर्फे सत्कार**




आजन्म जे करत समाजसेवा
झिजुनि स्वतः देत सुगंध सर्वां
सखा बंधु वाटे जया प्राणिमात्र
त्यांचेच आहोत आम्ही सुपुत्र ।।
घेऊनिया ध्यास चिरंतनाचा
अन् घेतला शोध अखंड त्याचा
निस्संग झाले, झाले विमुक्त
यांचेच आहोत आम्ही सुपुत्र ।।
वसुंधरा हेच कुटुंब ज्यांचे
बंधुत्व विश्वास कवेत घेते
अशा संस्कृतीतील विचारवंत
त्यांचेच आहोत आम्ही सुपुत्र ।।
प्रकांड पांडित्य प्रचंड शक्ती
प्रगाढ श्रद्धा नि अलोट भक्ती
ज्यांच्यामुळे होई भूमी पवित्र
त्यांचेच आहोत आम्ही सुपुत्र ।।
जपला सदा मंत्र गायत्री ज्यांनी
दुर्भावना स्वार्थ हवन करूनी
तेजात न्हाले जे सूर्यपुत्र
त्यांचेच आहोत आम्ही सुपुत्र ।।

**मी रचलेल्या आवडत्या कवितेतील काही कडवी**

मी अनेक कामांत सांस्कृतिक, सामाजिक उपक्रमांत सहभागी होत होतो. शाळांमधून व्याख्याने देणे, रोटरी, लायन्स क्लब या संस्थांद्वारे संपर्क व सामाजिक काम करण्याची संधी होती. नगरमध्ये गुढीपाडवा उत्साहाने साजरा करण्याची पद्धत सुरू करता आली याचा आनंद आहे. टेबल टेनिस हा माझा आवडता खेळ आहे. अजूनही मी आठवड्यात दोन-तीनदा खेळतो. गुजरातमध्ये असताना गुजरातच्या संघातही भाग घेता आला. २००५ साली माझ्या कवितांचे 'वेध' नावाचे एक पुस्तक प्रकाशित झाले. वेगवेगळ्या राज्यात रहात असताना किंवा प्रवासात लिहिलेल्या २००५पर्यंत लिहिलेल्या सर्व कवितांचा तो संग्रह आहे.

**उपासना हा गाभ्याचा भाग**

प्रबोधिनीत उपासना व त्यामागील विचार हा गाभ्याचा विचार आहे. तो पिलर आपले मूळ प्रेरणास्थान आहे. त्याचे विस्मरण होऊन चालणार नाही. सर्व समाजात सरसकट त्याचा प्रचार-प्रसार होण्यासाठी उपासनेची सोपी सुलभ आवृत्ती हवी असे मला मनापासून वाटते. प्रबोधिनीचे एक वैशिष्ट्य युनिकनेस म्हणून 'उपासना शास्त्र' आहे. त्यात आपण हवे तेवढ्या प्रमाणात लक्ष देऊ शकलो नाही. प्रगतीसाठी इहवादाचा आधार तर लागतोच. सांपत्तिक स्थिती सुधारणे, हक्कांची जाणीव होणे हे बदलासाठी आवश्यक आहेच पण आदर्श, प्रेरणा, समर्पण, आयुष्याची सार्थकता, हृदयगुण यांनी कार्यकर्त्यांना व समाजाला प्रेरित करणे मला जास्त महत्त्वाचे वाटते. व्यक्तीत व समाजातही मूलभूत बदल, वर्तणुकीतील बदल उपासना-अध्यात्म-चिंतनाने होईल, शिक्षणातही बदल याच प्रकारे होतील अशी माझी श्रद्धा आहे. गायत्री परिवार, पतंजली योग विद्यापीठ यांचे काम या स्वरूपाचे आहे ते काम वाढवावे लागेल.

प्रबोधिनीचे काम मला जास्त सामाजिक आणि इहवादी वाटते. असे असू शकेल की एखाद्या संस्थेला अनेक वर्षे टिकून राहण्यासाठी इहवादाचा आधार घेत-घेत पुढे जावे लागते. पण अध्यात्मिक क्षेत्रात प्रबोधिनी एवढे उतरून काम करत नाही ते केले पाहिजे असे मला वाटते. लोकांमध्ये अध्यात्मिक मार्गाने प्रेरणा चेतवून त्यांना समर्पण वृत्तीने काम करायला सांगणे असे प्रयत्न आपण करीत नाही. आचार आणि विचारात अध्यात्मिक प्रयत्नांनी अमूलाग्र बदल होतो. पतंजली आणि गायत्री परिवार हेच करतात. आणि मलाही याची अत्यंत गरज वाटते.

**५१@५१ या मालिकेबद्दल**

प्रशालेच्या पहिल्या दहा तुकड्यांमधील व्यक्तींचा प्रवास शब्दबद्ध करण्याचा हा उपक्रम मला चांगला वाटतो. सर्वच्या सर्व ५० गोष्टी मी वाचू शकलेलो नाही पण प्रत्येकाच्या वाटचालीतून काही ना काही महत्त्वाची शिकवण घेण्यासारखी असणारच. प्रत्येकानेच येणाऱ्या परिस्थितीला सामोरे जात मार्गक्रमणा केली आहे. आपण प्रबोधिनीत व्यक्ती विकास व कार्य विकास असे म्हणतो. एक्सलन्स आणि कमिटमेंट-आयडियालॉजी असे दोनही आदर्श आपण मानतो. व्यक्तींच्या वाटचालीतून त्यांचे-त्यांचे आयुष्य व कर्तृत्व तर नक्कीच फुलले, बहरले पण या प्रवासाचा समष्टीला काय उपयोग झाला यावरही भाष्य होणे, विचार करणे उपयुक्त आहे असे मला वाटते. आपल्याकडे 'ततः किम' हे पद्य आहे. प्रबोधिनीत शिकलेली व मिळवलेली मूळ शिदोरी पुढच्या प्रवासात आपण कशी उपयोजित करतो आहोत याचे प्रत्येकच प्रबोधकाने चिंतन करीत राहिले पाहिजे. ५१@५१ या मालिकेच्या निमित्ताने मला हेच मनापासून वाटते. देशप्रेम, नैतिकता, प्रेरणा, संपन्नता ही बीजे घेऊन प्रबोधिनी प्रशाला यातून आपण सर्वजण व्यवहारिक जगात उतरतो. या बीजे, रूपांचा वारसा घेऊन ती बीजे रुजवून आपले स्वतःचे व्यक्तिगत आयुष्य सार्थकी लागले का, समृद्ध झाले का व आपल्या आजूबाजूचे जग, जे सुंदर आहेच, ते अधिक सुंदर, समृद्ध होण्यासाठी आपण झटतो का? प्रबोधिनीत शिकवलेल्या वरवरच्या गोष्टी राहिल्या पण ही खोलवरची बीजे वैचारिक-शिदोरी, टिकवली-वाढवली ना, हे समजणे मला महत्त्वाचे वाटते!

**ततः किम् ?**

**वाच. अशोकराव निरफराके**

उमेदीत आरंभ हो जीवनाचा, कुलीनाघरी जन्म झाला ततः किम् ?
मिळे गोमटे रूप, बुद्धी कुशाग्र, सुविख्यात शाळेत आला ततः किम् ?
शिकूनि कला, शास्त्र, विद्या समग्र,परीक्षेत उच्चांक केला ततः किम्?
मिळे वैद्यकी, यांत्रिकीला प्रवेश, व्यवस्थापनी, शासनी वा ततः किम् ?
क्षणाचीच आरास जाईल वाया जरी जीवनी राष्ट्रसेवा घडे ना।। १ ।।

विदेशी प्रवासास जाणे घडे वा तिथे राहणे नित्य झाले ततः किम् ?
सुखे देखिली, ऐकिली, चाखिली अन् किती हुंगिली, स्पर्शिली ती ततः किम्?
बडी नोकरी वा निजी कारखाना पगारात, सत्तेत वृद्धी ततः किम्?
पदे भूषवीली पुढारीपणाची मिळाली समाजी प्रतिष्ठा ततः किम्?
क्षणाचीच आरास जाईल वाया जरी जीवनी राष्ट्रसेवा घडे ना।। ३ ।।

अशा शर्यती चालल्या आंधळ्यांच्या तयामागुनी धावणे हे ततः किम्?
कुठे जात आम्ही? पुढे काय आहे?असा प्रश्न का हो पडे ना तुम्हाला ?
जरी लोक येथील कोट्यानुकोटी कसे दैन्य देशात कोणी बघेना ?
करू मातृभूमी जगी श्रेष्ठ ऐशी चला पौरुषाची प्रतिज्ञा करू या
असे दिव्य आव्हान हे विक्रमाचे जिणे राष्ट्रकार्यार्थ हो कांचनाचे।। ५ ।।



**नातू मिहिर याचे व्रतबंधन**
**(मुलगी श्रुती हिचा मुलगा)**



**पुणे येथील नवीन घराच्या बागेत**

# RAPID FIRE

| | | | |
|---|---|---|---|
| १. | आवडते पुस्तक | : | योगी कथामृत, आचार्य श्रीराम शर्मा यांचे आत्मचरित्र, Third Wave by Alvin Toffler |
| २. | आवडता चित्रपट | : | 'आत्मविश्वास' – नाना पाटेकर यांचा. नगरमध्ये असताना आमच्या सर्व कर्मचाऱ्यांसाठी आम्ही त्याचे प्रक्षेपण केले. आत्मविश्वास वाढल्यावर स्वतःमध्ये कसा आमूलाग्र बदल कोणतीही व्यक्ती करू शकते याचे उत्कृष्ट चित्रण या चित्रपटात आहे. |
| ३. | आवडते ठिकाण | : | ऋषिकेश |
| ४. | योग | : | आत्मा व परमात्मा यांना जोडणारा मार्ग |
| ५. | गायत्री परिवार | : | सांस्कृतिक, धार्मिक व समाज परिवर्तनाची चळवळ |
| ६. | कम्युनिकेशन/ टेलिकम्युनिकेशन | : | जेव्हा स्वतःच्या मनात आलेले विचार दुसऱ्याला समजणे शक्य होईल ती व्यवस्था |
| ७. | ज्ञान प्रबोधिनी | : | समाजाचा, देशाचा, धर्माचा स्वाभिमान जागृत होऊन आमूलाग्र परिवर्तन व्हावे यासाठी प्रेरणा जागविणारी संस्था |
| ८. | आप्पा पेंडसे | : | शतशः प्रणाम! त्यांच्याकडून अनेकांना प्रेरणा मिळाली |
| ९. | कविता | : | जेव्हा विचार थांबतात तेव्हा कविता स्फुरते! |

१०. पुन्हा एकदा आयुष्य जगायला मिळाले तर काय करायला आवडेल :

अध्यात्मिक क्षेत्रात स्वतःची प्रगती करायला आवडेल. आत्ताच्या सुखवस्तू युवक पिढीत असुरक्षिततेची भावना दिसत नाही. आमच्या वेळेस त्या भावनेतून काही निर्णय घेतले. त्या-त्या वेळेस वाटणाऱ्या प्रवृत्ती कालांतराने महत्त्वाच्या वाटत नाहीत. पण प्रवृत्तीच्या द्वारे आयुष्याचा स्वीकार करत जाणे हे महत्त्वाचे!

**हेमंत जोगळेकर**
**7588283402**
**hemantpjoglekar@gmail.com**

**मुलाखत व शब्दांकन – श्रेयश फापाळे, अथर्व पाटणे    संपादन – मानसी बोडस, पल्लवी गोखले – नगरकर**

**आरेखन व मांडणी – निशिगंधा खळदकर**

Write to us : jpp51_51@jnanaprabodhini.org